रे.के.नं.३९/२०२१
नि. क्र. ४३

**नि.४६ वरील आदेशाने साक्षीदार क्र.१ यांचा उर्वरीत उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.संदेश भोसले यांचे तर्फे सुरु**

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, टॅकरला असलेल्या चार कप्प्यांमधील डिजेल एका कप्प्यातून दुसऱ्या कप्प्यात जावू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे चार कप्प्यांना चार वेगवेगळे व्हॉल्व्ह आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वाहन परिक्षक/निरीक्षक असतात. हे म्हणणे खरे आहे की, वाहन परिक्षक/ निरक्षकाचे डेपोतून एस.टी जाताना त्याचे निरीक्षण करण्याचे काम आहे. ते व्हेइकल रोजनाम्यावर शेरे मारतात. जर काही एस.टी. बसमध्ये दुरुस्तीचे काम असेलतर त्यावर नमुद केले जाते. हेड मेकॅनिक ते दुरुस्तीचे काम पुर्ण करतो. त्यानंतर गाडी वाहन परिक्षकाचे ताब्यात दिली जाते.

**१९.** वाहन परीक्षकाच्या आठ–आठ तासाच्या तीन डयुट्या व एक जनरल डयुटी असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे वाहन परीक्षक चोवीस तास डेपोमध्ये उपलब्ध असला पाहिजे. हे म्हणणे खरे आहे की, एस.टी डपोमधून सुटण्यापुर्वी साधारण अर्धा तास वाहन परीक्षकाकडून निरीक्षण होवून डेपोमध्ये उभी असते. हे म्हणणे खरे नाही की, वाहन परीक्षक लांब पल्याच्या एस.टी जाण्यापुर्वी अर्धा ते एक तास आधी वाहनामध्ये आवश्यक डिझेल भरून डेपोमध्ये उभी करतात. साक्षीदार स्वत: सांगतात की, एसटी आल्यानंतर चालकाच्या समोर इंधन लिपीक यांनी सहायकाकडून डिझेल भरून एस.टी लॉगशीट वाहन परीक्षक यांच्याकडे जमा करतात. त्यानंतर वाहन परीक्षक तपासून काही काम असलेतर ते हेड मेकॅनीकडे देतात.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की, वाहन परीक्षक देखील एस.टी मध्ये डिझेल भरून ठेवू शकतो.

**प्रश्न –** वाहन परीक्षक एस.टी बस मध्ये डिझेल भरायला गेल्यास त्याने ते भरू नये असा काही नियम आहे का ?

**उत्तर –** नाही. देता येते परंतु, काही तातडीचे कारण असेलतर किंवा एखाद्या

गाडीत कमी भरले गेले असेल तर गरजेनुसार देता येते.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, मी आगार व्यवस्थापक असताना चिपळूण आगारातून मुंबई, ठाणे, वसई, विरार, रत्नागिरी, कोल्हापूर, बेळगाव अशा आठ ते नऊ लांब पल्याच्या एस.टी. सकाळी निघायच्या. हे म्हणणे खरे आहे की, संध्याकाळी मुंबई, पुणे, अक्कलकोट, मिरज व कराड अशा एस.टी निघायच्या. हे म्हणणे खरे आहे की, लांब पल्याच्या एस.टी. डिझेल टाक्या पुर्ण भरुनच आगारातून पाठवतात. हे म्हणणे खरे आहे की, स्थानिक प्रवाशाच्या एस.ट्या सोयीप्रमाणे डिझेल भरायच्या. हे म्हणणे खरे आहे की, दि.१९.०८.२०१९ रोजी सकाळी व संध्याकाळी निघणाऱ्या एसट्यांना इंधन मिळाले नाही म्हणून कधी उशीर झाला नाही.

**२२.** हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला आगारामध्ये किती इंधानाची आवश्यकता आहे त्याची मागणी आम्ही इंडियन ऑईल कंपनीकडे एस.एम.एस. व्दारे करतो. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे टँकर आगारात आल्यानंतर तो आगारात आल्याचा एस.एम.एस. कंपनीला करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नियमित कार्यपध्दतीप्रमाणे मागणी केल्याप्रमाणे इंधन आले किंवा कमी आले तर कंपनीला तसा एस.एम.एस. पाठवतो. हे म्हणणे खरे आहे की, दि.१९.०८.२०१९ रोजी तसा एस.एम.एस. कंपनीला पाठवला नाही. साक्षीदार स्वत: सांगतात की, दुसऱ्या दिवशी पाठवला. त्या एस.एम.एस. चा स्क्रीन शॉट पोलीसांना दिला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही इंडयन ऑईल कॉरर्पोरेशनला निल शॉर्टेज असा एस.एम.एस. दि.२०.०८.२०१९ रोजी पाठवला. साक्षीदार पुन्हा सांगतात की, दि.१९.०८.२०१९ रोजी रात्री १०.१८ वा. पाठवला होता. तो दोषारोप पान क्र.९ वरती आहे.

**२३.** कंपनीचा माणूस दुसऱ्या दिवशी १२.०० वा. सुमारास आला. त्या व्यक्तीचे पद एरीया सेल्स मॅनेजर असे होते. त्याचे ओळखपत्र पाहिले होते. त्या व्यक्तीची पोलीसांना ओळख करून दिली होती किंवा कसे ते आत्ता आठवत नाही. त्या व्यक्तीची व पोलीसांची भेट झाली होती. टँकरमध्ये जी काही तथाकथीत जोडणी आढळून आली ती पोलीसांना दाखवली. हे म्हणणे खरे आहे की, ती जोडणी पोलीस व आरटीओ

नियमानुसार बेकायदेशीर आहे. पोलीसांनी टँकर जप्त केला. एस.टीच्या त्यावेळच्या इंधन टाक्या २५० लि. च्या होत्या. एस.टी सहा चाकी होती. हे म्हणणे खरे नाही की, टँकर १२ चाकी होता. हे म्हणणे खरे नाही की, टँकरची टाकी किती लिटरची आहे याची आम्ही चौकशी केली नाही.

**२४.** टँकरची इंधन क्षमता १६० लि. आहे. साक्षीदार स्वत: सांगतात की, माझा सरतपास जवळपास चार महिन्यापुर्वी झाला. त्यानंतर आता मला प्रश्न विचारल्यामुळे तो आता माझ्या लक्षात आला नाही. माझ्या लक्षात आले नसल्यामुळे ती १६० लि. असल्याचे सांगितले. परंतु, इंधन क्षमता २५० लि. होती. हे म्हणणे खरे आहे की, डेपोमधील जमिनीखाली टाकीमधील इंधनाची जबाबदारी इंधन लिपीकाची असते. हे म्हणणे खरे आहे की, एका इंधन लिपीकाची सेवा संपल्यानंतर दुसरा इंधन लिपीक येतो. त्यावेळी त्याची जबाबदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, दिवसभरात तीन त्यानंतर चौथा अशी जबाबदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, ते मीटर रिडींग व डीप तपासणी करून एकमेकाला चार्ज सोपवतात.

**२५.** हे म्हणणे खरे आहे की, इंधन लिपीकाच्या तपासणीध्ये काही चुक आढळल्यास आगार व्यवस्थापक म्हणून त्याची जबाबदारी माझ्यावर असते. आमच्या खात्यामध्ये कर्मचाऱ्यावर विभागीय चौकशी करण्याची पध्दत आहे. डेपोमधील विभागीय चौकशीची कारणे दाखवा नोटीस पाठवण्याचे काम माझ्याकडे असते. हे म्हणणे खरे आहे की, लिपीकाचा अभिलेख मी रोज पडताळतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.१९.०८.२०१९ पुर्वी जमिनीखालील टाकीमध्ये २०० लि. इंधनाचा हिशोब लागत नव्हता.

**प्रश्न –** २०० लि. इंधनाचा हिशोब लागत नव्हता त्यामुळे इंधन लिपीकास कारणे दाखवा नोटीस द्यावी लागत होती ?

**उत्तर –** असे काही घडले नाही.

**२६.** हे म्हणणे खरे नाही की, आपल्याच आगारातील कर्मचाऱ्याला वायवायचे म्हणून टँकरबाबत खोटी कथने केली व २०० लि. डिझेल बाबत आमचा आकडा वर

खाली होत आहे. हे म्हणणे खरे नाही की, टँकर आमच्या ताब्यात होता. हे म्हणणे खरे नाही की, आगारात वेल्डींग चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, टँकरला आमच्या आगारात आम्ही वेल्डींग केले. हे म्हणणे खरे नाही की, २०० लि. डिझेलचे पैसे इंडीयन ऑईल कंपनीला द्यायचे नव्हते व ते पैसे आगारात वापरायचे होते म्हणून आरोपीविरूध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्हीच इंडीयन ऑईल कंपनीची फसवणूक केली.

२७. हे म्हणणे खरे नाही की, टँकर लोडींग अनलोडींग होताना इंधन लिपीक डीप पाहणी घेतो. हे म्हणणे खरे नाही की, इंधन लिपीक जेव्हा बदलतात त्यावेळी नविन येणारा इंधन लिपीक डीप पाहणी करत नाही. इंधन देवघेव रजिस्टरमध्ये मीटर रिडींगची नोंद असते. ज्यावेळी टँकर लोडींग अनलोडींग करतो त्यावेळी रजिस्टरच्या मागील बाजूस डीप व मीटर रिडींगच्या दोन्ही नोंदी केल्या जातात. २०१ नावाचे एक रजिस्टर असते. त्यामध्ये ज्या गाड्यांना डिझेल दिले जाते त्यावर चालकाच्या नावाची नोंद असते. याव्यतिरीक्त जेव्हा लिपीकाची शीफ्ट बदलली जाते त्यावेळी डीप व २०१ रजि. वरील नोंदी एकमेकाच्या तपासून ताब्यात घेतले जातात.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी इंधन लिपीकाची शीफ्ट बदलली जाते त्यावेळी देवघेव रजि. वर केवळ मीटर रीडींगची नोंद असते. साक्षीदार स्वत: सांगतात की, त्यावर मीटर रीडींग व डीप ची नोंद असते. डीप नोंद शीफ्ट टू शीफ्ट २०१ रजि. वर करत नाही. डीप रजि. वर त्या नोंदी करतो. हे म्हणणे खरे नाही की, शीफ्ट टू शीफ्ट मीटर रीडींगप्रमाणे होते. तसे रजि. मी न्यायालयात दाखल करू शकतो. आगारात एक आड एक दिवस इंधन टँकर लागतो. हे म्हणणे खरे नाही की, बरेच टँकर चालक आम्हाला घाई आहे लगेच इंधन खाली करा अशी गडबड करतात. हे म्हणणे खरे नाही की, टँकरमधील इंधन खाली करून घेण्याची प्रथम जबाबदारी इंधन लिपीकाची आहे.

**२९.** ज्यावेळी मी आगार व्यवस्थापक म्हणून रूजू झोलो तेव्हा पासून माझ्या ड्युटीवेळी टँकर लोडींग व अनलोडींगवेळी मी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, १८.०८.२०१९ मध्ये टँकरमधील अनलोडींग सुरळीत एकसंघ चालू होते. हे म्हणणे खरे

नाही की, ते आम्ही थांबवले असे खोटे सांगत आहे. रत्नागिरी येथील वरीष्ठ त्याच दिवशी संध्या ०७.०० वा. सुमारास आले. त्यांनी पोलीसांची भेट घेतली. टँकरच्या इंधन टाकीमध्ये डिझेल बाहेर काढून त्याचे मोजमाप किती लि. होते ते केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचे टँकर चालकासोबत भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तसेच मालकासोबत देखील भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, चालकास तुझा करार कसे काय रद्द होत नाही अशी धमकी दिली व खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपसातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन करतो त्याप्रमाणे आरोपीने जोडणी–बीडणी काही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तसे काही केले नसल्यामुळे पोलीसांनी जप्त केले नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फरेतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/–
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग–१, चिपळूण.

दिनांक – २७/०२/२०२६
चिपळूण.

# - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २७.०२.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २७.०२.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २७.०२.२०२६ |